# कै.रसिका महाविद्यालय, देवणी

## राष्ट्रीय सेवा योजना

यूवकाचा ध्यास : ग्राम शहर विकास शिबीर कालावधी (01 ते 07 फेब्रुवारी 2023)

विशेष वार्षिक शिबीर अहवाल

**01) पहिला दिवस :**

दि. 01/02/2023 रोजी शिबीरस्थळी दुपारी 2 वाजता महाविद्यालयातून प्रस्थान. दुपारी 2.30 वाजता शिबीर स्थळी आगमन निवास स्थळांची स्वच्छता करुन निवासाची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर दूपारी 3.00 वाजता सर्व स्वयंसेवकासोबत शिबीर कालावधीत करावयाच्या कामाचे नियोजन करण्यता आले. या नियोजनात दैनंदीन कामाचे नियोजन. कार्यक्रमाचे उद्घाटन गावात शोषखड्डे तयार करणे. ग्राम स्वच्छता करणे, विविध विषयावर व्याख्यान आयोजित करणे. सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करणे, गावाचे सर्वेक्षण करणे या कामाच्या बाबतीत चर्चा करण्यात आली.

**02) दूसरा दिवस :**

दि. 02/02/2023 रोजी प्रात:विधी नंतर योगासने व प्राणायाम करण्यात आले. त्यानंतर निवासाची व्यवस्था असलेल्या शाळेची पूर्ण स्वच्छता करण्यात आली. यानंतर अल्पोहार घेऊन गावातील प्रतिष्ठित नागरीकांना पत्रिकेचे वाटप करण्यात आले. यानंतर उद्घाटन कार्यक्रमाची तयारी करून कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री प्रवीणजी डोईजोडे याच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री गोविंदरावजी भोपणीकर साहेब हे होते. यावेळी आबेगावच्या सरपंच सौ. केरबाताई सूर्यवंशी व सोबत सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. उद्घाटन सत्रानंतर सर्व अतिथी व स्वयंसेवक यांचे दूपारचे भोजन होऊन सायंकाळच्या सत्रात दूसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमाची पूर्वतयारी करण्यात आली.

**03) तिसरा दिवस :**

दि. 03/02/2023 रोजी सकाळी योगासन, अल्होहार नंतर निवासस्थळाची स्वच्छता करुन आंबेगाव येथे मीयावाकी या योजने अंतर्गत लावलेल्या रोपटे व वृक्ष या जागेवर स्वच्छता करुन रोपाना आळे करण्यात आले व रोपटयांना पाणी देऊन पूर्नजिवीत करण्यात आले. यानंतर स्वयंसेवकांनी ग्रामपंचायत समोरील नाले सफाई केली व स्वयंसेविकाने गावातील उकीरडयातील स्वच्छता करुन कचऱ्याची विल्हेवाट लावली. यानंतर स्वयंसेवकांनी गावात प्रभातफेरी काढुन पुढील कार्यक्रमाबद्दल माहीती दिली व घोषणा दिल्या.

दुपारच्या सत्रात डॉ. योगेश मूळे यांनी चला डिजीटल बनूया या विषयावर व्याख्यान संपन्न झाले यावेळी त्यांनी डिजीटल व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्यवसाय कसे करावे व शिक्षणात कसा उपयोग करावा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले दूपारच्या सत्रात खेळ व चर्चा करण्यात आली.

**04) चौथा दिवस :**

दि. 04/02/2023 रोजी सकाळच्या अल्पोहार नंतर गावात दोन ठिकाणी शोषखड्डे करण्यात आले यामध्ये नामदेव काटमपल्ले व त्र्यंबक गरीबे याच्या घरासमोर शोषखड्डा करण्यात आला. यावेळी नामदेव

काटमपल्ले यानी स्वयंसेवकाना चहापान व्यवस्था केली. स्वयंसेविकाने गावातील महादेव मंदीराची व परिसराची संपूर्ण स्वच्छता केली दूपारच्या सत्रात डॉ.आनंद मूसळे यांचे व्याख्यान आयोजीत करण्यात आले. त्यांनी महिला सबलीकरण स्त्रीभ्रूण हत्या व बालविवाह या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

संध्याकाळच्या सत्रात प्रा. अजीत जाधव यांचे व्याख्यान शिवचरित्रातून आपण काय शिकावे या विषयावर आयोजीत करण्यात आले यावेळी छत्रपती शिवाजी महाराज याच्या इतिहासावर व्याख्यात्यानी व्याख्यान दिले या कार्यक्रमास गावातील 300 व्यक्ती उपस्थित होते.

**5) पाचवा दिवस :**

दि. 05/02/2023 रोजी सकाळच्या दैनंदिन कामानंतर गावात दि. 03/02/2023 रोजी तयार केलेल्या मीयावाकी योजनेतील रोपटयांना पाईपच्या सहाय्याने पाणी देण्यात आले. यावेळी स्वयंसेवकांनी प्रत्येक रोपटयाला पाणी कसे पोहचेल या दृष्टीने आळे केले व पाणी दिले. दूपारच्या सत्रात स्वयंसेवकांनी गावात फिरून दि. 06/02/2023 रोजी होणाऱ्या नेत्र तपासणीसाठी गावातील नागरिकाना येण्याचे अवाहन केले.

**6) सहावा दिवस :**

दि. 06/02/2023 रोजी सकाळच्या नित्य कार्यानंतर उदयगीरी लॉयन्स हॉस्पीटल येथील प्रतिक जाधव व प्रमोद भांगे यांनी ग्रामस्थांची नेत्ररोग तपासणी केली यावेळी 40 ग्रामस्थाची मोतीबिंदू तपासणी करुन 15 लोकांनी मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी उदगीर येथे बोलावण्यात आले. यावेळी नेत्ररोग संबंधी विविध तपासणी करण्यात आली. दूपारच्या सत्रात निसर्गाचा आनंद घेण्यासाठी स्वयंसेवक आंबेगाव येथील महाविद्यालयाचे सेवक शंकर म्हेत्रे यांच्या शेतात शेतीतील विविध पदार्थाचे अस्वाद स्वयंसेवकांनी घेतले.

**7) सातवा दिवस :**

दि. 07/02/2023 रोजी शिबीराचा समारोप कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून पद्मीनबाई म्हेत्रे. आंबेगाव या उपस्थित होत्या. तर प्रमूख पाहूणे म्हणून मा. श्री लक्ष्मणराव दारनूळे, सौ. मधूश्री घाडगे पाटील मॅडम उपस्थित होत्या. सोबतच जि.प.आंबेगाव चे मूख्याध्यापक श्री संभाजी जाधव सर हे उपस्थित होते. यावेळी शिबीराचा आढावा डॉ. गोपाल सोमाणी यांनी सांगितले तर प्रमुख पाहूण्यानी आपले मनोगत मांडले. यामध्ये स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी आरती बिरादार यांनी केले. तर आभार अंजली स्वामी हिने मानले. समारोपानंतर सर्वांनी स्नेह भोजनाचा अस्वाद घेतला व शिबीर दूपारी 4.00 वाजता देवणीकडे रवाना झाले.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग
कै रसिका महाविद्यालय देवणी

Principal
Kal. Rasika Mahavidyalaya
Deoni Dist. Latur